महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९४ /२०२२ दि. १४/१०/२०२२

## "वाहतूक नियंत्रण अधिसूचना"

**ज्याअर्थी** उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे कार्यक्षेत्रातील उल्हासनगर कॅम्प नं. २ व ३ मधील नेहरू चौक ते शिरू चौक दरम्यान रस्त्यावर मुख्य बाजारपेठ असल्यामुळे दिपावली सणानिमित्त दि. १४/१०/२०२२ ते दि. २७/१०/२०२२ रोजी पावेतो सदर परिसरात नागरिकांची खरेदीसाठी मोठया प्रमाणात गर्दी होत असते. याकरीता दि. १४/१०/२०२२ ते दि. २७/१०/२०२२ रोजी पर्यंत सकाळी ०९:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो सदर परिसरात वाहतुकीची प्रचंड कोंडी होवू नये व वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

**प्रवेश बंद** :– उल्हासनगर कॅम्प नं. २ मधील नेहरू चौक कडून शिरू चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना दि. १४/१०/२०२२ ते दि. २७/१०/२०२२ रोजी पर्यंत रोजी सकाळी ०९:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो नेहरू चौक येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने नेहरू चौक येथून देवी भवानी चौक, गोल मैदान येथून उल्हासनगर नं. १ मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसूचना दि. १४/१०/२०२२ ते दि. २७/१०/२०२२ रोजी पर्यंत सकाळी ०९:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील. सदरची अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील इतर वाहनांना लागू राहणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

- मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
- मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
- मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
- मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.
- मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, विठ्ठलवाडी.
- नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर
- ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** – पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. उल्हासनगर वाहतूक विभाग/पोनि उल्हासनगर वाहतूक उपविभाग.
२/– उल्हासनगर महानगरपालिकेच्या संबंधित अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CS CamScanner